**कृषि हवामान सल्ला पत्रक, पालघर जिल्हा**
**ग्रामीण कृषि मौसम सेवा, जिल्हा कृषि हवामान केंद्र**
**गोखले एज्युकेशन सोसायटी, कृषि विज्ञान केंद्र, कोसबाड हिल**

**अंक ९०/२०२०** **दिनांक १० /११ /२०२०** **कालावधी ५दिवस**

| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०४ /११/२०२० ते १०/११/२०२०) सदर हवामान घटकांची नोंद भात संशोधन केंद्र, पालघर येथून घेण्यात आली आहे | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ११ /११ /२०२० सकाळी ८:३० पासून १५ /११ /२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०४/११ | ०५/११ | ०६/११ | ०७/११ | ०८/११ | ०९/११ | १०/११ | | ११/११ | १२/११ | १३/११ | १४/११ | १५/११ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| | | | | | | | कमाल तापमान (अं.से) | ३४ | ३३ | ३५ | ३५ | ३७ |
| | | | | | | | किमान तापमान (अं.से) | २० | २० | २१ | २३ | २५ |
| | | | | | | | मेघाच्छादन (ऑक्टा) | ० | ० | १ | १ | २ |
| | | | | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ५३ | ४९ | ५५ | ६९ | ६८ |
| | | | | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता | २६ | २६ | २६ | ४० | ४० |
| | | | | | | | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ९ | ९ | ८ | ६ | ५ |
| | | | | | | | वाऱ्याची दिशा | पू. | पू. | ई. पू. | ई. पू. | ई. |
| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | | | | | | | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | | | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा | | |
| ०.० | | | | | | | ३१२०.२ | | | ४२३३.४ | | |

## हवामान आधारित कृषि सल्ला

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| हवामान पूर्वानुमान | | • **प्रादेशिक हवामान विभाग मुंबई, द्वारे देण्यात आलेल्या अंदाजानुसार दिनांक ११ ते १५ नोव्हेंबर, २०२० दरम्यान कमाल तापमान ३३ ते ३७ अंश सेल्सियस व किमान तापमान २० ते २५ अंश सेल्सियस राहण्याची शक्यता आहे.** |
| सामान्य सल्ला | | • पिकांमध्ये सुत्रकृमी व फळ पोखरणाऱ्या अळीच्या व्यवस्थापनासाठी पुर्नलागवड करताना पिका भोवती झेंडूच्या सापळा पिकाची लागवड करावी.<br>• हरभरा पिकाची पेरणी १५ नोव्हेबेर पर्यंत करून घ्यावी, पेरणीस जास्त उशीर झाल्यास किमान तापमान खूपच कमी होऊन उगवण उशिरा आणि कमी होते. |
| भात | पेरणी | • रब्बी उन्हाळी भात लागवड करण्यासाठी रोपवाटिका तयार करण्याची पूर्व तयारी करण्यास सुरवात करावी. |
| हरभरा | पेरणी | • हरभरा लागवडीसाठी मध्यम ते भारी, काळी कसदार, पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन निवडावी. पाणथळ, चोपण, क्षारयुक्त जमिनीत हरभऱ्याची पेरणी टाळावी. बागायती पेरणी २० ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर दरम्यान करावी. पेरणीस जास्त उशीर झाल्यास किमान तापमान खूपच कमी होऊन उगवण उशिरा आणि कमी होते. पिकाची वाढ कमी होऊन फांद्या, फुले व घाटे कमी लागतात. |
| तूर | फुलोरा | • तूरीवर शेंगा पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून किडीच्या अळया शेंगाना छिद्र पाडून अर्धे शरीर बाहेर व अर्धे आत ठेवून दाणे खाते. मोठ्या अळ्या दाणे पोखरून खावून शेंगांचे नुकसान करते. या किडीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास किडीच्या नियंत्रणासाठी क्लोरॅनट्रोनीलीपोल १८.५ टक्के ३ मि.ली. किंवा स्पिनोसॅड ४५% प्रवाही २.५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| फुल पिके | रोपवाटिका | • कमाल तापमानात वाढ होण्याची शक्यता असल्याने पेरणी झालेल्या फुलपिकांच्या रोपवाटीकेस नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी. |

| | | |
|---|---|---|
| **आंबा** | **वाढीची अवस्था** | • नवीन लागवडीतील आंबा कलमाच्या जोडाखालील येणारी फुट वेळोवेळी काढून टाकावीत तसेच कलमा भोवती वाढलेली झुडपे व इतर काडी कचरा गोळा करून नष्ट करावे. |
| **काजू** | **वाढीची अवस्था** | • नवीन लागवडीतील काजू कलमाच्या जोडाखालील येणारी फुट वेळोवेळी काढून टाकावीत तसेच कलमा भोवती वाढलेली झुडपे व इतर काडी कचरा गोळा करून नष्ट करावीत. |
| **चिकू** | **फळ धारणा** | • चिकू फळातील बी पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी चिकू बागेतील किडग्रस्त तसेच गळलेली सर्व फळे व पालापाचोळा गोळा करून जाळून नष्ट करावा. तसेच ५० टक्के प्रवाही प्रोफेनोफोस १५ मि. ली. किंवा १४.५ टक्के प्रवाही इंडोक्झाकार्ब ५ मि.ली किंवा २.८ टक्के प्रवाही डेल्टामेथ्रीन १० मि. ली. कीटकनाशकंची आलटून पालटून प्रति १० लिटर पाण्यातून एक महिन्याच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात. |
| **वेलवर्गीय भाजीपाला** | **पुर्नलागवड** | • कारली, दुधी आणि काकडी भाजीपाला रोपांची लागवड झाल्या नंतर मर रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ५० ग्रॅम ट्रायकोडर्मा या जैविक बुरशीनाशकाची १० लिटर पाण्यात मिसळून आळवणी करावी. |
| **कोबी** | **पुर्नलागवड** | • कोबी पिकाची रोपे लागवडीयोग्य झाली असल्यास पुर्नलागवड करावी. लागवड सरीवरंब्यावर किंवा सपाट वाफ्यावर करावी. रोपे लागवडी पुर्वी थोडावेळ १% युरियाच्या द्रावणात बुडवावीत, व लागवड ४५ x ४५ से.मी. किंवा ६० x ६० से.मी. अंतरावर करावी. लागवडीनंतर लगेच पाणी दयावे. |
| **भाजीपाला** | **पुर्नलागवड** | • टोमेटो, वांगी, मिरची पिकांमध्ये सुत्रकृमी व फळ पोखरणाऱ्या अळीच्या व्यवस्थापनासाठी पुर्नलागवड करताना पिका भोवती झेंडूच्या सापळा पिकाची लागवड करावी.<br>• तसेच मर रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लागवड झाल्यानंतर ५० ग्रॅम ट्रायकोडर्मा या जैविक बुरशीनाशकाची १० लिटर पाण्यात मिसळून आळवणी करावी. |
| **पशु पालन** | | • किमान तापमानात घट होत असल्याने थंडी पासून जनावरांचे व कोंबडयाचे संरक्षण करण्यासाठी शेड भोवती बारदाण्याचे पडदे लावावे जेणेकरून गोठा उबदार राहील. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका गोखले एज्युकेशन सोसायटीचे कृषि विज्ञान केंद्र, कोसबाड हिल येथील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली आहे.**

**ई-मेल :kvkkosbad439@gmail.com** **संपर्क:8552882712**

**स्त्रोत**

१) **हवामान पूर्वानुमान** : प्रादेशिक हवामान केंद्र , मुंबई
२) **मागील हवामान** : भात संशोधन केंद्र, पालघर

**ठिकाण** : कृषि विज्ञान केंद्र पालघर
**दिनांक** : १०.११.२०२०

**स्वाक्षरित**
**प्रमुख अन्वेषक, ग्रामीण कृषि मौसम सेवा - जिल्हा कृषि हवामान केंद्र**
**कृषि विज्ञान केंद्र कोसबाड हिल**